# महिला सबलीकरण या संकल्पनेवर आधारित आंतरमहाविद्यालयीन परिसंवाद

दिनांक १२ ऑक्टोबर २०२१ रोजी कुळगाव-बदलापूर येथील आदर्श विद्या प्रसारक संस्थेच्या आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालयात 'IQAC' आणि 'मराठी भाषा आणि वाङ्मय मंडळ' आयोजित 'महिला सबलीकरण' या संकल्पनेवर आधारित आंतर महाविद्यालयीन परिसंवाद सकाळी ११:१५ वाजता आयोजित करण्यात आला होता.

परिसंवादातील प्रमुख अतिथी आणि वक्ते अनुक्रमे उल्हासनगर येथील श्रीमती चांदीबाई हिम्मथमल मनसुखानी महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नीतिन आरेकर यांनी स्त्रीमुक्तीच्या पाऊलखुणा : सावित्री आणि रमा आणि मुंबई विद्यापीठातील तत्त्वज्ञान विभागातील सहयोगी प्रा. डॉ. मीनल कातरणीकर यांनी त्वमेव जननी परा : डॉ. रखमाबाई राऊत व आचार्य चंदनाजी या विषयावर सर्वांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. आरेकर यांनी आपल्या व्याख्यानातून 'सावित्रीबाई फुले' आणि 'रमाबाई रानडे' या दोघींच्या जीवनचरित्राचा आलेख मांडला. 'या दोघींनी ही आधी अनुगामिनी, नंतर सहचारिणी आणि शेवटी स्वयंप्रज्ञा असा आपल्या जीवनाचा प्रवास करून स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीआरोग्य, स्त्रीची आत्मनिर्भरता आणि स्त्रीचा आत्मसन्मान यासाठी अथक प्रयत्न केले, हे भारतीय समाजावरील या दोघींचे ऋण आहेत' आणि 'पुरुषत्वाचा अभिमान हा स्त्रीच्याच कुशीतून जन्माला आला आहे, हे पुरुषाने विसरू नये.' असे मत प्रतिपादन केले. तर डॉ. मीनल कातरणीकर यांनी भारतातील पहिल्या महिला व्यावसायिक डॉ. रखमाबाई राऊत यांचा जीवन प्रवास उलगडून दाखविला. तसेच आपल्या व्याख्यानात त्यांनी रखमाबाईबरोबरच आजच्या काळात हयात असलेल्या आचार्य चंदनाजी या दोघींना प्राप्त झालेली परिस्थितीची प्रतिकुलता, त्या विरोधात त्यांनी दाखविलेला लढाऊ बाणा आणि त्यांचे आपापल्या कार्यक्षेत्रातील उत्तुंग कर्तृत्व उलगडून दाखविले. ज्या काळात स्त्री अस्तित्वाची जिथे दखल घेतली जात नव्हती अशा काळात स्त्री आरोग्य आणि स्त्रीचा अवकाश यासाठी रखमाबाईंनी लढा दिला तर कालौघात अनावश्यक ठरलेली कर्मकांडे आणि बाह्याचाऱ्यांचा त्याग करून जैन धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आध्यात्मिकतेबरोबरच सामाजिक दृष्टिकोण अंगिकारून समाजसेवा आणि समाजप्रबोधन करणाऱ्या आचार्य चंदनाजी यांच्या कार्याची ओळख डॉ. कातरणीकर मॅडमने करून दिली. एकुणच स्त्री चरित्र आणि स्त्री चारित्र्य यादृष्टीने सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, डॉ. रखमाबाई राऊत आणि आचार्य चंदनाजी या चौघींचा आदर्श वस्तुपाठ आजच्या तरुण विद्यार्थ्यांसमोर दोन्हीही वक्त्यांनी आपल्या व्याख्यानांतून अत्यंत प्रभावीपणे मांडला.

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव मा.श्री. पंढरीनाथ बाविस्कर यांनी प्रास्ताविकपर मनोगतात नवरात्रीच्या दिवसातील देवी उपासना आणि स्त्री सामर्थ्य या दृष्टीने आजचा परिसंवाद औचित्यपूर्ण आहे, असे सांगितले. परिसंवादाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. संगीता पांडे यांनी व्यष्टी ते समष्टीला घडविणाऱ्या या चारही स्त्रियांचा लढाऊ बाणा, परिस्थितीशी झगडू नका सुसंगत अशी केलेली उक्ती आणि कृती या साऱ्या गोष्टींची आजच्या तरुणाईला गरज आहे, त्यांना असे 'रोलमॉडेल' समोर असतील तर भारतीय समाज समृद्ध आणि विचार संपन्न घडेल, असा आशावाद व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप भेले आणि पाहुण्यांचा परिचय अनुक्रमे डॉ. प्रतिभा टेंबे आणि प्रा. दक्षा हलकारे यांनी तसेच ईशस्तवन कु. साहिल विशे याने तर आभारप्रदर्शन श्री. लक्ष्मीकांत सातपुते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या, प्राचार्या डॉ. वैदेही दप्तरदार, प्रभारी प्राचार्या डॉ. संगीता पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. तर परिसंवादात विद्यार्थ्यांच्या प्रश्नोत्तर सत्रात रंगलेल्या चर्चांनी परिसंवादाची यशस्विता अधिक वृद्धिंगत झाली.

IQAC समन्वयक
मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष
- दक्षा हलकारे डॉ. संदीप भेले